प्रश्नपत्रीका संच

Question Paper Set

# A

# परभणी जिल्हा पोलीस भरती-२०२१

## लेखी चाचणी प्रश्न पत्रीका

दिनांक ०२/०४/२०२३

प्रश्न पत्रीका क्रमांक
Question Booklet No.
0133

वेळ- ९० मिनीट

एकुण प्रश्न-१००

एकुण गुण-१००

**महत्वाच्या सुचना**

CHEST NO. छाती क्रमांक ➢ 0418

---

- पर्यवेक्षकाकडील हजरीपटावर आपल्या चेस्ट नंबर समोर दिलेल्या रकान्याप्रमाणे अचुक माहिती भरुन स्वाक्षरी करावी. उत्तर पत्रीकेवर उमेदवारांनी चुक केल्यास त्यास नवीन उत्तर पत्रीका देण्यात येणार नाही त्यास उमेदवार स्वत: जवाबदार राहील.
- सदर प्रश्नपुस्तिकेत १०० अनिवार्य प्रश्न आहत. उमेदवारांनी प्रश्नाची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका पर्यवक्षक अधीकारी यांचेकडुन लगचे बदलुन घ्यावी.
- उत्तरपत्रीका लिहीण्याकरीता निळया/काळया रंगाच्या बॉल पेनचा वापर करावा.
- परिक्षा केंद्रावरील पर्यवेक्षकाने मागणी केल्यास उमेदवारांनी प्रवेशपत्र (Admit Card) दाखवावे.
- उत्तर पत्रिकेत एकदा नमूदकेलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल.
- प्रत्येक प्रश्नाला समान प्रत्येकी एक गुण आहे.
- प्रश्नपत्रीकेवर/उत्तर पत्रीकेवर कसल्याही प्रकारच्या खानाखुणा करु नयेत, प्रश्न पत्रीकेच्या शेवटच्या पानावर खालील बाजुला/मागील बाजुस कच्चे काम करण्याची मुभा देण्यात आलेली आहे.
- उत्तरपत्रीका ही दोन प्रतीत असल्यामुळे दोन्ही प्रती वेगळया न करता, न हलवता उत्तराच्या वर्तुळाला गोल करावे. वरील प्रत हालविल्याने जर कार्बन प्रतीवरील वर्तुळ अन्य ठिकाणी छायांकीत झाल्यास त्याला उमेदवार स्वत: जवाबदार राहील.
- परिक्षेसाठी दिलेल्या वेळेत परिक्षा संपल्यानंतर उमेदवाराने आपल्या उत्तर पत्रीका पर्यवेक्षकाकडे जमा करावी व नंतर छायांकीत प्रत स्वत:कडे ठेवावी.

Scanned by CamScanner

# परभणी जिल्हा पोलीस भरती - 2021 A

01 " युवा " नामाचे विरुध्द लिंगी रुप ओळखा ?
A) युवती B) युवक C) युवी D) युव

02 " भाषा " या नामाचे अनेकवचनी रुप काय आहे ?
A) भाष B) भाषिक C) भाषे D) भाषा

03 जर A : B = 3 : 4 आणि C : B = 8 : 1 आणि A = 30 तर B + C = ?
A) 270 B) 180 C) 360 D) 240

04 संधी सोडवा. " षण्मास " ?
A) षण + मास B) षणा + मास C) षणम + मास D) षट् + मास

05 `दिक् + अंतर ` या दोन पदांच्या योग्य संधी ओळखा ?
A) दिगंतर B) दिकंतर C) दिक्यंतर D) दिकुंतर

06 प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य पर्याय निवडा.
15, 12, 13, 10, 11, 8, ?
A) 7 B) 6 C) 8 D) 9

07 अक्षर मालिकेतील प्रश्नचिन्हासाठी योग्य पर्याय निवडा ?
E, F, H, K, ?
A) M B) O C) N D) P

08 जर BEST हा शब्द DCUR या संकेताक्षरांनी लिहीला जातो, तर GOOD हा शब्द कसा लिहीला जाईल ?
A) IMQC B) KSTU C) IMQB D) IOPN

09 (1) CHM (2) HMR (3) LPU (4) DIN
यामध्ये विसंगत गट कोणता आहे ?
A) 1 B) 2 C) 3 D) 4

10 पुजा हिचा जन्म रविवार दिनांक 1 डिसेंबर 1996 रोजी झाला तर, तिचा तिसरा वाढदिवस कोणत्या वारी आला असेल.
A) मंगळवार B) सोमवार C) गुरुवार D) बुधवार

11 BCDA : STUR :: KLMJ : ?
A) EFHG B) XDPS C) VWXU D) RSTU

12 प्रदिपचा वर्गात वरचा क्रमांक 9 वा आणि तळापासुन 38 वा आहे तर वर्गात एकुण किती विद्यार्थी आहेत ?
A) 47 B) 45 C) 46 D) 48

13 ड्रायव्हिंग : बस :: उड्डाण : ?
A) हवा B) पक्षी C) पतंग D) विमान

14 विक्रम म्हणाला, " ती माझ्या वडीलांच्या बहिणीच्या मुलाची आजी आहे " तर ती महिला आणि विक्रमचा संबंध कसा आहे ?
A) आई B) मावशी C) बहिण D) आजी.

15 PS : DG :: ?
A) CE : TR B) KM : OQ C) EH : TW D) FH : JL

16 स्वातंत्र्य लढयातील `तुफान सेना` ही महाराष्ट्रातील कोणत्या जिल्हयात स्थापन झाली होती ?
A) परभणी B) नांदेड C) सातारा D) अकोला

17 उषा मेहता यांनी भुमिगत राहुन आकाशवाणी केंद्र कोठे चालविले ?
A) पुणे B) नागपूर C) मिरत D) मुंबई

18 गावाच्या विकासासंबंधी अंतिम निर्णय घेणारी सत्ता कोणती ?
A) ग्राम पंचायत B) ग्राम सेवक C) सरपंच D) ग्राम सभा

19 रविंद्र जडेजा हा खालील पैकी कोणत्या राज्याचा आहे ?
A) बिहार B) गुजरात C) महाराष्ट्र D) मध्यप्रदेश

20 सध्या भारताचे मुख्य निवडणुक आयुक्त कोण आहेत ?
A) सुकुमार सेन B) नविन चावला C) राजीव कुमार D) सुनिल अरोरा

21 महाराष्ट्र राज्य पक्षी कोणता आहे ?
A) गरुड B) पोपट C) हरियाल D) मोर

22 96 वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन कोणत्या शहरात पार पडले ?
A) परभणी B) वर्धा C) नागपूर D) मुंबई

23 लवलीना बोरगोहेन खालील पैकी कोणत्या खेळाशी संबधीत आहे ?
A) बॅडमिंटन B) क्रिकेट C) बॉक्सिंग D) शुटींग

24 सध्या महाराष्ट्राचे राज्यपाल कोण आहेत ?
A) सी विद्यासागर राव B) एस एम कृष्णा C) भगत सिंह कोश्यारी D) रमेश बैस

25 माहिती अधिकार - 2005 कायदयान्वये अर्जदारास किती दिवसांत माहिती पुरविण्यात येते ?
A) 30 दिवस B) 90 दिवस C) 45 दिवस D) 60 दिवस

26 संगणकाचे कसे वापरणे म्हणजे हॅकिंग ?
A) मान्यताप्राप्त B) स्वतः C) मान्यता नसलेले D) सर्वांसाठी



Scanned by CamScanner

27 खालील पैकी चुकीची जोडी ओळखा.
A) तामिळनाडु - मल्याळम B) कर्नाटक - कन्नड C) महाराष्ट्र - मराठी D) आन्ध्र प्रदेश - तेलगु

28 रु 100 च्या नोटेवर कोणाची सही असते ?
A) वित्त सचिव B) रिझर्व बँकेचे गव्हर्नर C) राज्यपाल D) प्रधानमंत्री

29 FIR चा फुल फॉर्म काय आहे ?
A) Fast Information Report B) First Information Report
C) First Incident Report D) Fast Incident Report

30 अपहृत झालेल्या मुलांना परत नेण्यासाठी परभणी पोलीसांनी कोणते अभियान सुरु केले ?
A) ऑपरेशन मदत B) ऑपरेशन नमस्ते C) ऑपरेशन मुस्कान D) ऑपरेशन खुशी

31 परभणी जिल्हयात किती तालुके आहेत ?
A) 08 B) 09 C) 06 D) 07

32 " परभणी क्रांती " काय आहे ?
A) भेंडीचे प्रकार B) वर्तमानपत्र C) राजकीय पक्ष D) संघटन

33 परभणी जिल्हयात खालील पैकी कोणती नदी वाहत नाही ?
A) पुर्णा B) दुधणा C) वैनगंगा D) गोदावरी

34 भारतातील प्रमुख अवकाश केंद्र कोठे आहे ?
A) श्रीहरीकोटा B) हसन C) बेंगलोर D) कोचीन

35 `मॅक मोहन` ही रेषा कोणत्या दोन देशा दरम्यान आहे ?
A) भारत - पाकीस्तान B) भारत - मॅनमार C) भारत - चीन D) भारत - श्रीलंका

36 आसामच्या राजधानीचे नाव काय आहे ?
A) गोहाटी B) दिसपुर C) सिलचर D) शिलाँग

37 भारतातील सर्वात लांब नदी कोणती ?
A) गोदावरी B) गंगा C) कृष्णा D) कावेरी

38 लक्षद्विप कोठे स्थित आहे ?
A) अरब सागर B) हिन्द महासागर C) बंगालची खाडी D) प्रशांत महासागर

39 खालीलपैकी कोणत राज्य "Seven Sisters" चा भाग नाही आहे ?
A) असाम B) सिक्कीम C) त्रिपुरा D) मनिपूर

40 कोणता अधिकारी सर्वात वरिष्ठ दर्जाचा आहे ?
A) पोलीस उपमहानिरीक्षक B) पोलीस अधीक्षक C) अपर पोलीस अधीक्षक D) अपर पोलीस महासंचालक

41 खालील पैकी कोणते एक सर्च इंजिन नाही ?
A) Google B) Baidu C) Yahoo D) Norton

42 खालील पैकी Twitter चे संस्थापक कोण आहेत ?
A) मार्क झुकरबर्ग B) एलन मस्क C) बिल गेटस् D) सुन्दर पिचायी

43 भाभा ॲटोमीक रिसर्च सेंटर कोठे आहे ?
A) पुणे B) मुंबई C) औरंगाबाद D) नागपूर

44 "साल्हेर शिखर" कोणत्या जिल्हयात आहे ?
A) नाशिक B) पुणे C) अहमदनगर D) कोल्हापूर

45 जर $2x + 3y = 7$ आणि $4x - 3y = 5$ तर $y$ = ? किती
A) 4 B) 2 C) 3 D) 1

46 एक कार 3 तासात 105 कि.मी. अंतर जाते, तर त्याच वेगाने 5 तासात किती अंतर जाईल ?
A) 175 कि.मी. B) 150 कि.मी. C) 125 कि.मी. D) 160 कि.मी.

47 सोडवा $\frac{23}{100} + \frac{47}{10} + \frac{33}{10} = ?$
A) 0.823 B) 82.3 C) 8.23 D) 0.0823

48 अचुक शब्द ओळखा ?
A) कृतिम B) कृत्रिम C) कुत्रीम D) करुत्रिम

49 पर्यायी उत्तरातील शुध्द शब्द कोणता ?
A) जमीन जुमला B) जमिन जुमला C) जमीनजूमला D) जमिनजूमला

50 समानार्थी शब्द ओळख - " अभ्यास " ?
A) व्यासंग B) प्रधान C) सत्य D) प्रवास

51 राजुने एक पेन 75 रुपयास खरेदी करुन 105 रुपयास विकला तर त्यास किती टक्के नफा झाला ?
A) 100 टक्के B) 50 टक्के C) 40 टक्के D) 125 टक्के

52 2528 X 16 + 1834 X 96 - 1396 X 12 = ?
A) 196960 B) 199760 C) 197960 D) 179960



Scanned by CamScanner

53 2.5 X 0.25 X 0.025 = ?
A) 1.5625 B) 0.0015625 C) 0.015625 D) 0.15625

54 एक काम 15 माणसे 18 दिवसात करतात तर तेच काम 9 माणसे किती दिवसात करतील ?
A) 30 B) 25 C) 20 D) 28

55 $\frac{3.75}{0.75}$ = ?
A) 0.005 B) 0.5 C) 5 D) 0.05

56 एका वर्गातील सर्व मुलांच्या गुणांची बेरीज 2795 इतकी आहे व सरासरी 65 आहे. तर त्या वर्गात किती मुले असतील ?
A) 45 B) 55 C) 43 D) 60

57 2200 चा 15% किती आहे.
A) 300 B) 330 C) 320 D) 400

58 ` सुर्य ` या शब्दाचे लिंग ओळखा ?
A) पुल्लिग B) स्त्रीलिंग C) नपुंसकलिंग D) यापैकी नाही

59 वचन बदला " सासु " ?
A) सासु B) सास्या C) सासवा D) सास

60 गटात न बसणारा शब्द ओळखा ?
A) कवि B) गुरु C) घर D) मधु

61 " तु + कडे " या शब्दाला षष्ठीचा प्रत्यय लागल्यावर त्याचे रुप कसे होईल ?
A) तु - कडे B) तुझ्याकडे C) तूकडे D) तुच्याकडे

62 संधी सोडवा - " मन : पटल " ?
A) मन + पटल B) मनस् + पटल C) मनो + पटल D) मन: + पटल

63 कुमार आणि राजा यांच्या वयाची बेरीज 70 वर्ष आहे. त्यांच्या वयातील अंतर 10 वर्ष आहे तर राजाचे वय किती ?
A) 45 B) 30 C) 80 D) 20

64 A : B = 4 : 6 आणि B : C = 18 : 5 तर A : B : C = ?
A) 2 : 3 : 5 B) 4 : 6 : 5 C) 8 : 12 : 5 D) 12 : 18 : 5

65 सोडवा $\frac{6-2\times3+6}{2+6\times3-4}$
A) $\frac{9}{8}$ B) $\frac{3}{10}$ C) $\frac{3}{8}$ D) $\frac{3}{5}$

66 " आकर्षण " या शब्दाचे विरुध्दार्थी शब्द कोणता ?
A) अनाकर्षण B) आकर्षिक C) सुंदर D) यापैकी नाही

67 खालील पर्यायातुन अनेकवचनी पर्याय निवडा ?
A) माणूस B) बदके C) घर D) झाड

68 योग्य शब्दाची निवड करा ?
" घर बंद असल्याने घरात खूप ------------ असतील "
A) उंदीर B) उंदीरे C) उंदरी D) उंदरे

69 प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य पर्याय निवडा.
ACE, FHJ, KMO, ?
A) BDF B) PRT C) WYT D) UXZ

70 आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिवस कधी साजरा केला जातो ?
A) जुन 5 B) मार्च 16 C) एप्रिल 23 D) डिसेंबर 10

71 परभणी जिल्हयात किती लोकसभा मतदार संघ आहेत ?
A) 02 B) 03 C) 01 D) 04

72 गटात न बसणारी संख्या ओळखा ?
61, 63, 67, 73, 81, 91, 103, 101
A) 61 B) 81 C) 91 D) 101

73 पहिले वैयक्तीक सत्याग्रही म्हणुन कोणाची निवड झाली ?
A) जवाहरलाल नेहरु B) सरदार पटेल C) विनोबा भावे D) महात्मा गांधी

74 महात्मा गांधींनी केलेला सत्याग्रहाचा पहिला प्रयोग कोणता ?
A) चंपारण B) मुळशी C) खेडा D) बार्डोली

75 WTO चे फुल फॉर्म काय आहे ?
A) World Trade Organisation. B) World Telecom Organisation.
C) World Telephone Organisation. D) World Treaty Organisation.



Scanned by CamScanner

76 परभणी जिल्हयात किती पोलीस स्टेशन आहेत ?
A) 20 B) 18 C) 19 D) 21

77 माहिती तंत्रज्ञान कायदा 2000 हा कायदा कशासाठी आहे ?
A) फसवणुक B) सायबर गुन्हे C) सायबर कॅफे D) बँक कामा निमीत्त

78 125 चे 12% + 200 चे 13% - 50 चे 12% = किती
A) 35 B) 25 C) 45 D) 30

79 " गायरान " या शब्दाचे लिंग ओळखा ?
A) पुल्लिग B) नपुंसकलिंग C) स्त्रीलिंग D) यापैकी नाही

80 केसरी या वृत्तपत्राशी कोण संबधीत आहे ?
A) बिपीनचंद्र पाल B) दादाभाई नौरोजी C) लोकमान्य टिळक D) सुरेन्दनाथ बॅनर्जी

81 जय जवान, जय किसान या महान घोषणेचे जनक खालील पैकी कोण आहे?
A) जवाहरलाल नेहरु B) महात्मा गांधी C) लाला लजपतराय D) लालबहादुर शास्त्री

82 इतिहासात विशेष महत्व असलेले जालियनवाला बाग कोठे आहे ?
A) पटना B) लुधियाणा C) अमृतसर D) हरियाणा

83 पुजा हिचा जन्म रविवार दिनांक 1 डिसेंबर 1996 रोजी झाला तर, पुजाचा 9 वा वाढदिवस कोणत्या वारी येईल ?
A) गुरुवार B) शुक्रवार C) शनिवार D) रविवार

84 NATIONAL हा शब्द सांकेतिक लिपीत LANOITAN असा लिहीला तर TELECOM हा शब्द त्याच सांकेतिक लिपीत कसा लिहीणार ?
A) MCEOLET B) CMOELET C) MOCELET D) MLECOET

85 जर PARBHANI हा शब्द 16118281149 असा लिहीला तर POLICE कसा लिहीला जाईल ?
A) 16151 B) 161512935 C) 161512 D) 171219

86 केंद्रीय निवडणुक आयोगाने कोणत्या राज्यामध्ये विधानसभा निवडणुकीची घोषणा केली आहे ?
A) कर्नाटक B) केरळ C) राजस्थान D) महाराष्ट्र

87 पहिली महिला आय पी एल क्रिकेट स्पर्धा कोणत्या संघाने जिंकली ?
A) मुंबई इंडियन्स B) युपी वारियर्स C) दिल्ली कॅपिटल्स D) गुजरात टायटन्स

88 " जळु " या शब्दाचे अनेकवचन लिहा. ?
A) जळवा B) जळये C) जळू D) जळूवे

89 " शिस्त " या शब्दाचे विरुध्दार्थी शब्द कोणता ?
A) अशिस्त B) नाशिस्त C) बेशिस्त D) यापैकी नाही

90 " जसे करावे तसे भरावे " म्हणजे काय ?
A) पापाला प्रायश्चित मिळणे B) जेवढे नकसान तेवढे भरपाई
C) आपल्या कृतीप्रमाणे आपणास फळ मिळते D) वाईटाचे फळ वाईट मिळणे

91 नामाचा प्रकार ओळखा - " समुद्र " ?
A) समूहवाचक नाम B) भाववाचक नाम C) सामान्य नाम D) विशेष नाम

92 पुजा हिचा जन्म रविवार दिनांक 1 डिसेंबर 1996 रोजी झाला तर, 1997 ची 31 जानेवारी रोजी कोणता वार असेल. ?
A) बुधवार B) गुरुवार C) शुक्रवार D) शनिवार

93 खालील पैकी कोण सद्या केंद्रीय अर्थमंत्री आहेत ?
A) नितीन गडकरी B) निर्मला सितारामन C) राजनाथ सिंह D) अमित शहा

94 खालील पैकी कोणत्या ठिकाणी विमानतळ नाही ?
A) अहमदनगर B) जळगाव C) नाशिक D) सांगली

95 एका वस्तुची किंमत रु 3000 आहे. जर त्यावस्तुवर 10% सुट मिळाल्यास त्या वस्तुची किंमत किती होईल ?
A) 2970 B) 2700 C) 2988 D) 2880

96 एका कारखान्यात एक यंत्र 840 बॉटल 6 तासात भरते तर ते यंत्र 4 तासात किती बॉटल भरेल ?
A) 700 B) 560 C) 550 D) 500

97 भोपाळ गॅस दुर्घटना कधी घडली ?
A) 1984 B) 1985 C) 1994 D) 1974

98 सारनाथ अशोक स्तंभ कोठे आहे ?
A) उत्तर प्रदेश B) मध्यप्रदेश C) बिहार D) महाराष्ट्र

99 अमरला परीक्षेतील 5 विषयात 85, 90, 78, 64, 63 असे गुण मिळाले तर त्याला सरासरी एकुण किती गुण मिळाले ?
A) 78 B) 64 C) 76 D) 74

100 12 : 132 :: 24 : ?
A) 464 B) 264 C) 444 D) 246

---------------- समाप्त ------------------



Scanned by CamScanner